: प्रकरण तिसरे :

**"वानगी" या कथासंग्रहाची स्वरूप व वैशिष्ट्ये**

## : प्रकरण तिसरे :

## "वानगी" या कथासंग्रहातील कथेचे स्वरूप व वैशिष्ट्ये

**प्रास्ताविक :-**

मागील प्रकरणात आपण 'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहातील कथेचे स्वरूप-विशेष अभ्यासले. कथेचा आशय, समाजचित्रण, भाषाशैली इत्यादी अंगाने हा अभ्यास करताना त्यांच्या कथेचे वेगळेपणही तपासले आहे. प्रस्तुत प्रकरणात "वानगी" या कथासंग्रहाचे स्वरूप अभ्यासावयाचे आहे. याही कथांचा अभ्यास आशय, समाजचित्रण, भाषाशैली इत्यादी अंगाने करावयाचा आहे.

१९६० नंतरच्या कथाकारात आणि कादंबरीकारात उद्धव ज. शेळके हे महत्वाचे लेखक ठरले आहेत. त्यानी आपल्या लेखनातून प्रामुख्याने ग्रामीण जीवनच केंद्रस्थानी ठेवले आहे. वैदर्भीय जीवनातील ग्रामीणतेचा उभा आडवा छेद शेळके घेताना दिसतात. त्यामुळे रसातळातील लोकांचे जीवन महाराष्ट्राच्या समोर आले. प्रस्तुत कथासंग्रहातही याच पद्धतीने त्यानी जीवनाचा छेद घेतला आहे. तो पाहताना सर्वप्रथम त्यांच्या कथांचा आशय पाहणे आवश्यक ठरते.

**कथेचा आशय : "वानगी" मधील कथेची आशयसूत्रे :-**

सर्वसामान्य माणसाच्या जीवनावर उद्धव ज. शेळके प्रकाश टाकतात. त्यावेळी त्यांचे दुःख, व्यथा, वेदना, कष्ट कथेत मांडलेल्या असतात. जमीनदार सवर्ण यांनी मजूर आणि दलित लोकांचा केलेला छळ अगदी मोजक्या वर्णनात आणि परिणामकारकतेने मांडतात. ही मांडणी करीत असताना कुठेही आक्रस्ताळेपणा नसतो. कलावंताची तटस्थ भूमिका घेऊनच ते जीवन चित्रित करतात.

कुणाच्यातरी अन्यायाला बळी पडलेल्या ग्रामीण व्यक्तिरेखांचे विश्व या ठिकाणी चित्रित झालेले आहे. यामध्ये प्रामुख्याने "दाद", "मास्तर", "गिधाड", "वडवानल" इत्यादी कथा आहेत. "दाद" मधील बसंती तिच्यावर देव्रावने बळजबरी केली म्हणून तिची आजी तिला घेऊन गावातील भिमा पाटलाकडे तक्रार करायला जाते. पण त्यांची व्यथा बाजूलाच राहते. भिमा पाटलामधील पुरूष जागा व्हायला सुरूवात होते त्यामुळे बसंतीला देव्रावने कसे कसे केले हे सांगायला लावतो. तिच्या फाटक्या कपडयातून दिसणाऱ्या शरीराच्या अवयवाकडे त्याचे लक्ष असते. कथा इथे संपते पण बसंतीची वेदना बाजूल राहते आणि भिमा पाटील आणि त्याचे मित्र तिच्या तशाही अवस्थेतल्या शरीराचा वेध घेण्यात गुंतलेले दिसतात. दलित असलेल्या बसंती आणि तिच्या आजीला उगीच आपण इथ आलो असे होऊन जाते. "गिधाड" आणि "वडवानल" या दोन कथाही स्त्रियावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणाऱ्या आहेत. "गिधाड" मधील भिमराव आपल्या जावायाला दिलेले पाचशे रूपये परत मिळविण्यासाठी अनेक प्रयत्न करतो त्यामुळे तो त्याच्या मुलीला त्रास देवू लागतो. प्रसंगी तिला उपाशी ठेवतो पण याचे भिमरावला काही वाटत नाही. तो माहेरी आलेल्या आपल्या मुलीला जाच होत असूनही व तिची जायची इच्छा नसूनही सासरी पाठवितो. या मागचे कारण आपली बायको कासाबाई हिला सांगताना म्हणतो, "मून का तिच्यासाठी मी माहयवाले पान्शे रूपये डुबु देवू का त्याच्याकडे? एक डा व का पोट्टीले त्याच्यासंग धाडलं नसतं त मग थे आपले पैसे देवाल होता काय?" (पृष्ठ २५५) एकाचवेळी मुलीची व्यथा जाणवत असूनही परिस्थितीवर मात करण्यासाठी भिमरावला असा निर्णय घ्यावा लागतो पण त्याला बळी पडते मात्र त्याची मुलगी.

"वडवानल" मधील ती अशीच घरच्या परिस्थितीला बळी पडून वेडी झालेली आहे. तिचा चुलता नांदत्या घरून आणून तिला गावी ठेवतो. यातच तिला दिवस जातात व ते दुसऱ्याकडून गेले असे उठवले जाते. म्हणून ती वेडी झालेली आहे. असंबद्ध बडबडणारी ती स्टेशनवरच पडून असते. एवढेच नाहीतर कुणापासून तरी आपल्याला

मूल होणार आहे हे ती शेवटपर्यंत विसरत नाही. "मास्तर" मधील श्रीपत नानासाहेब देशमुखाच्या गावी मास्तर म्हणून आलेला आहे. नानासाहेबांचा संपूर्ण गावावर वचक असतो. याचे प्रत्यंतर हेडमास्तर, गाववाला, दुकानदार यांच्या वागण्यावरून येते. पण तरीही मास्तर बोलावण आलं नाही म्हणून त्यांच्या घरी जेवायला जात नाही. हे समजते तेव्हा पाच सात माणसे जेवतील एवढे अन्न मोठया ताटात आणून श्रीपत आणि त्यांचा मुलगा केशव यास खावयास लावतो.. उलट आपल्या नावाचा त्याने डांगोरा पिटला म्हणून त्याच्याशी अर्वाच्य शिव्या देवून वागणूक करतो. आपली प्रतिष्ठा पणाला लावण्यासाठी ही माणसे कधी कोणत्या पातळीवर जातील हे सांगता येणे कठीण आहे.

पुरूषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व असलेल्या भारतीय परंपरेत आजही स्त्रियांवर पुरूषप्रधान संस्कृतीचा पगडा आहे. नवरा आणि मूल याशिवाय आपले अस्तित्व असू शकत नाही. ही जाणीव त्यांच्या मनात पक्की रूजलेली असते. यामुळे ब-याचदा स्त्रियाना अन्याय सहन करावे लागतात. या दृष्टीने या कथासंग्राहात "अर्धांगी", "पीळ", "ताठा", "राडंमुंड" इत्यादी कथा अभ्यासनीय आहेत.

"अर्धांगी" या कथेची नायिका सखू आपल्या नव-याला (विठोबा) महारोग झाला आहे. म्हणून दवाखान्यात तपासायला नेते. तेथे सर्वप्रथम पैसे मागितले जातात पण हे पैसे देणे त्याना अशक्य नसल्याने ती विनवणी करते. त्याला तपासले जाते आणि चार वर्षे इथेच रहावे लागेल असे सांगितले जाते. यामुळे विठोबा हतबल होतो. त्यापेक्षा मेलेले बरे असे म्हणू लागतो पण सखू धीर खचू देत नाही. उलट त्याला प्रोत्साहन देते. विठोबा पोटापाण्याच्या गोष्टी करायला लागतो तेंव्हा ती म्हणते, "तुमचा जीव आये त इस्टनच आये माहयवली, तुमी लेकरा बायाईची काई कायजी नोका करू। माझ्या जीवात जीव आये तवही मी त्याईले उपासी नाई मरू देत" (पृष्ठ ११४) अशी ही सखू आपले स्त्रीत्व नव-यासाठी पणाला लावते.

'रांडमुंड' ही कथा विधवा स्त्रीचे जीवन आणि तिची व्यथा मांडणारी आहे. आपला नवरा मेल्यामुळे ती पोटासाठी सरकारी कामावर जात असते. तेथे काम करणा-या पुरूषांच्या वासनेने बरबटलेल्या नजरा सहन करते. विधवा बाई म्हणजे तिला कोणीही वाली नाही. अशी एक काहीशी भूमिका भारतीय जनमाणसात रूजलेली आहे. ते सर्व सहन करीत ती जगत असते. एवढेच नव्हे तर आपल्या एकूलत्या एक मुलाला दिवाळीसाठी नवे कपडे ती घेऊ शकत नाही. याचे तिला फार वाईट वाटते. तरीही दारिद्र्याशी झुंजत, जगण्याचा संघर्ष करीत ती एकेक दिवस मागे टाकत असते. त्याबद्दल तिच्या मनात असलीच तर खंत असते. याशिवाय दुसरे काही नसते.

'ताठा' या कथेतील आजी आपले म्हातारपण कसे तरी जगत आहे. तरीही तिच्यातील ताठा कायम आहे. दिसत नसूनही सून काय म्हणाली तर लगेच कपडे घेऊन ती घर सोडून जाते. दोन दोन महिने मानलेल्या भावाकडे राहते. तिचे लेक तिला बोलवायला आले तरी ती जात नाही. सुनेशी भांडणे झाल्यावर ती घर सोडते आणि भाऊ वारल्यामुळे स्टँडवर जाऊन बसत असते. दिवसभर अशी बसते पैसे असतील तर मुरमुरे नाही तर असेच काही तरी खात असते. शेवटी रात्र झाली तरी परतत नाही त्यामुळे थोरला लेक तिला उचलून आणतो. जेवायला बसल्यावर सुद्धा तिची घरात न बसण्याची भाषा चालू असते पण त्याचवेळी आपल्या नाकर्तेपणाचीही जाणीव तिला गप्प बसायला भाग पाडते. एकीकडे ताठा आणि दुसरीकडे हतबलपणा या कैंचीत सापडलेली आजी इथे चित्रित केली आहे.

खेडयात दवाखान्यापेक्षा देव, देवऋषी बघण्याकडे जास्त कल असतो. एवढेच नव्हेतर तत्कालीन समाजात डॉक्टरबद्दल एक अविश्वसाची भूमिकाच होती. याचा प्रत्यय 'पीक' या कथेत येतो हे शीर्षक दोन्हीही दृष्टीने पाहण्यासारखे आहे. एकाच वेळी मूल वाचावे म्हणून म्हातारीच्या मनाला पीळ पडत आहे. आणि त्याचवेळी म्हातारपण

येऊनही ती सूर्याला म्हणजे आपल्या मूलाला रक्त द्यायला तयार होते. यावरून तिच्यातली स्फूर्ती ही पीळच्या अंगाने आपणाला प्रत्यय देते. इथे आपले मूल महत्वाचे आहे असे तिला वाटते म्हणून ती रक्त द्यायला तयार होते. त्यामुळे स्त्रीच्या समर्पणशील वृतीचा प्रत्यय आपणाला येत राहतो.

आणखी एका गोष्टींची नोंद येथेच घ्यावी लागते. शेळक्यांच्या कथेतील प्रत्येक पात्र हे खेडयातील पात्र आहे. खेडयातील दुष्काळ, दारिद्रय याला बळी पडलेल्या अनेक व्यक्ती येथे भेटतात प्रस्तूत "पीळ", "रांडमुंड", "ताठा" सारख्या कथेतील स्त्रिया यामुळेच पिचल्या आहेत. पण याचवेळी ती पात्रे दुःखाला सामोरे जाताना कुठलीही अस्वस्थपणाची भूमिका घेत नाहीत आहे हे असे आहेत. त्याशिवाय पर्याय नाही असे मानूनच ती जगत असतात दुःखाचा अतिरेक कधीही करताना दिसत नाहीत.

उपरोक्त अंगानेच त्यानी कथालेखन केलेले नाही. अनेकविध विषय प्रस्तुत कथासंग्रहात हाताळले आहेत. "साधुबुवा", "भडका", "आबा", "जाणीव", "लंगडा म्हादू" या कथेत आयुष्यातला एकाकीपणा लपवत, जपत जीवन जगणाऱ्या माणसांचे चित्रण केले आहे. साधुबुवा, संपत, आबा, वामन, म्हादू या सारख्या व्यक्ती आपापल्या व्यथेने विव्हळ झालेल्या आहेत. पोटासाठी अतोनात कष्ट करूनही पोटाला चांगले खायला मिळत नाही. म्हणून साधुबुवाचे नेहमी पोट दुःखते त्यामुळे तो जेवायचे देखील कधीमधी टाळतो. रॉकेल आणायची इच्छा असतानाही आणत नाही. कुठल्यातरी सार्वजनिक ठिकाणी राहून आणि तेथील अर्धकच्च अन्न खाऊन राहण्याचा त्याला वैताग आलेला असतो. त्याच्याबरोबरच डोमा, सोमा, राम इत्यादी नवजवानही राहत असतात तेही याला कंटाळलेली असतात पण त्यांचा इलाज नसतो. अशाही परिस्थितीत रतनसेठ मारवाडयाच्या मुलाच्या लग्नातील एकेक बुंदा मिळणार आहे हे ऐकल्यावर साधुबुवा पोट दुखत असुनही जेवायला निघतो. केवळ पोट भरणे एवढेच ध्येय त्यांच्यासमोर असते कोणतीही स्वप्न आशाआकांक्षा त्यांना नसतात.

आबा देखील याहून वेगळा नाही. मशीनवर पोट भरणारा आबा आठवडाभर अखंड मशीन चालवतो आणि तयार कपडे विकण्यासाठी शेंदूर्जन्याच्या बाजारला जातो. तेथून येताना कापडाचे शक्य तेवढे स्वस्त तुकडे घेऊन येतो. आणि त्यातून बसेल तसे चंच्या, पिशव्या, झबले, कानटोपरे बनवत असतो. आणि आला दिवस मागे टाकत असतो. थकलेला असूनही अखंडपणे झगडत राहतो. "धग"मधील कौतिकचा सासरा आणि आबा यांच्यामध्ये बरेचसे साम्य आहे. हया गोष्टीचा मुद्दामहून उल्लेख करावासा वाटतो.

बायको कुणाचातरी हात धरून पळून गेली आहे म्हणून "भडका" मधील संपत हतबल झाला आहे. आपली व्यथा दडवण्यासाठी तो दारू प्यायला सुरूवात करतो. पण मारती आल्यावर मी व्यसन म्हणून पीत नाही असे तो सांगतो. एवढेच नव्हेतर आपले दुःख उघडे पडू नये म्हणून आसल्या सतरा बायका करीन असा आव तो मारत्यापुढे आणतो. एकीकडे बायको पळून गेली आहे म्हणून दुःख आहे तर दुसरीकडे एकाकीपणा आणि त्यावर टोचण्या देणारे मारत्यासारखे लोक आहेत. म्हणून त्याच्या जीवाचा "भडका" उडतो. उद्विग्न झालेल्या संपतला कशाचेही भान राहत नाही. त्यामुळे त्याच्या मनःस्थितीचे वर्णन करताना लेखक म्हणतो, "चुलीतल्या गजातल पाणी कधीच आटून गेल होत. जाळ सुरूच होता. त्यामुळं चुलीवरचा गंज क्षणाक्षणाला मोडीतल्या भांडयासारखं वाकत होता. तेच झाकणीच होत होतं संपत जाळ लावत होता."(पृष्ठ ४०) बाहयवर्णनातून माणसाच्या अंतर्मनाचे चित्रण करण्यात शेळके यांना लक्षणीय यश मिळाले आहे. या संग्रहातील ब-याचशा कथामधून अशा प्रकारे वर्णने आलेली आहेत.

वामनची आई आजारी आहे. या जाणिवेने वामन खूपच अस्वस्थ झाला आहे. "जाणीव" या कथेचा हाच विषय आहे. प्रेसमध्ये काम करणारा वामन नेहमी प्रमाणे काम करत असूनही तो अस्वस्थ असतो. इतर कामगाराना मैना न भेटल्यामुळे

तो अस्वस्थ असेल असे वाटल्याने ते ज्याला बोलत करण्याचा प्रयत्न करतात. पण आपल्या विधवा आईने आयुष्यभर कष्ट करून आपणाला मोठे केले पण आज आपण काही करू शकत नाही. याची त्याला जाणीव होते आणि त्यामुळे तो अस्वस्थ आहे त्याचबरोबर एकाकीपणाची भीती असलेला वामन अजाबरावला म्हणतो, "इस दुनियामें मैं बिलकुल अकेला रह जाऊंगा अजाबराव मै बिलकुल अकेला रह जाऊंगा....." (पृष्ठ ७८) आपली आई आपल्याला सोडून गेल्यावर आपण संपूर्ण एकटे पडू या जाणिवेने वामन हादरून गेला आहे.

"लंगडा म्हादू" ही कथा एका एकाकी पुरूषाची कहाणी आहे. तो विधूर आहे. म्हादूचे दुःख लेखकाने मांडले आहे. मराठी कथा साहित्यात विधवा स्त्रियांचे दुःख 'पण लक्षात कोण घेतो' पासून आलेले आहे. आजही ते चित्रण येत आहे. पण विधूर पुरूषाचे चित्र मराठी साहित्यात म्हणावे तेवढे झाले नव्हते पण उद्धव ज. शेळके यांनी त्या दुष्टीने प्रयत्न केले आहेत. "लंगडा म्हादू" ही कथा त्यापैकीच एक आहे. म्हादू हा दुसऱ्याच्या शेतात पिकाला राखण करतो. इमानदारीने तो आपले काम करतो. तरीही आपण विधूर आहोत याची खंत त्याला फारशी वाटत नाही. म्हणूनच तो पोराला पडलेले टाके आणि लंगडया पायाची कहाणी अनेकाना रंगून जाऊन सांगतो. तसेच त्याला अनेक वनस्पतीची औषधे माहीत असल्याने तो अनेकाना न विचारता औषधे घेण्यास सांगतो. रांगडे जीवन जगणारा म्हादू साप चावल्यावर स्वतःच्या हाताने पायाची बोटे तोडून टाकतो. एकाकी जीवन जगणारा म्हादू आपला लळा आपण करत असलेल्या चाकरीत लावतो. स्वतःला विसरून इमानाने तो चाकरी करतो.

"डाक्तर" आणि "धंदा" सारख्या कथामधून व्यवसायावर प्रेम करणारी माणसे रंगविली आहेत. ग्रामीण परिसर, दारिद्रय, भांडवलाची आबाळ आणि तरीही चिकाटीने धंदा करण्याची वृत्ती यांची दिसून येते. वेळप्रसंगी अपमान सहन करतात, उदार देतात

पण धंदयाशी एकनिष्ठ राहतात. त्याशिवाय त्या परिसरात त्यांच्याकडे पर्यायही नसतो. "धंदा" ही कथा एका हॉटेलचा धंदा करणारा सखारामची आहे. गावातील स्टँडच्या कडेला त्याचे कुडाचे हॉटेल आहे. वेळेवर हॉटेल उघडण्यासाठी तो बायकोवर चिडून चहा न पिता येतो. उघडल्यानंतर पाणी आणायला जातो येताना गोवरीचे पेटलेले खांड घेऊन येतो. भट्टी पेटविण्यासाठी काडीपेटी नसलेला सखाराम दोन साहेब आले म्हणून चहाची तयारी करू लागतो. दरम्यान दूध कुत्र्याने संपवलेले असते. तरीही दूध आणण्यात चहा आटून जातो. एक तर तो निम्मा गुळ आणि साखरेचा असतो. कपबशी एकच असते. दुस-या साहेबाला चहा देण्यासाठी कमी पडतो. म्हणून त्यात पाणी ओततो. साहेब ओरडून चहा पितो आणि सुट्टे पैसे नाहीत म्हणून तसेच जातात. तरीही तो धंदा आहे असे समजून सखाराम उसने हसतो. पोट भरण्यासाठी करावी लागणारी धडपड, अपमान सहन करत तो धंदा टिकवून ठेवतो. कारण त्याच्याकडे दुसरा पर्याय नसतो.

"डाक्तर" कथेतील सोमा डाक्तर असतो पण त्याच्याकडे कोणी येत नाही. म्हणून त्याला वाईट वाटत असते. त्याच्या गावातील यादोरावाचा मुलगा गोपाळ आजारी असताना त्याला इंजेक्शन देवू देत नाही म्हणून सोमाला राग असतो. डाक्तरकी बरोबर तो सोनाराचा व्यवसाय, देव-देवऋषीपण देखील करत असतो. गोपाळला जास्तच झाल्यावर जेव्हा त्याला बोलावणे येते तेव्हा त्याच्यातील पेशा आणि अभिमान जागा होतो. त्यामुळे तो लगेचच जात नाही ब-याच वेळाने जातो. तेव्हाही आपण किती मोठे आहोत हे दाखवत असतो पण इंजेक्शन देताना त्यावरील नाव तो शेजारच्या पावण्यास विचारतो कुठलीही पदवी न घेतलेल्या सोमाला पदवीविषयी आणि शहरातील डाक्तर विषयी तिरस्कार असतो. त्याचवेळी स्वतःच्या धंदयाविषयी मात्र अतोनात अभिमान असतो.

"उमेद" कथेतील मामाला वयाचो ५० वर्षे उलटून गेली तरी आपले लग्न होईल याची खात्री असते. ब्राहमण असलेला मामाला विधवा किंवा दुस-या जातीची

मुलगी चालत नाही. आपल्याच जातीतील मुलगी हवी असते व ती मिळेल याची त्याला उमेद आहे. हॉटेलात काम करणारा मामा सांगकाम्या आहे. विनोदी माध्यमातून ही कथा उद्धव ज. शेळक्यानी उत्कृष्ट रीतीने साकार केली आहे. मामाच्या विक्षिप्त मूडवर विनोदी शैलीनी त्यानी समर्पक प्रकाश टाकला आहे.

प्रस्तुत कथासंग्रहात जवळ जवळ सर्व कथा ग्रामीण कथा आहेत. त्याला फक्त "दबाव" ही कथा अपवाद आहे. या कथेत एका संस्थेचे राजकारण कसे असतेयाचे चित्रण केले आहे. मिटींगला वेळेवर जाण्यासाठी शिक्षक वर्ग अर्ध्यावर सोडून जातात मिटींगमध्ये सेक्रटरी बदलण्याचा ठराव मांडला जातो त्यावेळची पांडे, कारंजकर, पुरोहित यांची हालचाल म्हणजे दबाव यंत्रणाच आहे. सेक्रटरीसाठी दबावामुळे कुणाचेही नाव पुढे येत नाही. तेव्हा सेक्रटरीच जे पूर्वी तीन सदस्य होते तेच सुचवतात आणि आपोआप तेच सेक्रटरी राहतात. ही दबावयंत्रणा चांगल्या चांगल्या माणसाना हतबल करते याचा प्रत्यय या कथेत येतो.

"मात" या कथेत न्याय व्यवस्थेतील भ्रष्टाचार बद्दलचे चित्र झालेले आहे. डोमा कसल्यातरी प्रकरणात तुरूंगात जातो पण तो सुटून येतो आल्यानंतर त्याच्या मग्रूर वागण्यात आणखीच भर पडते. त्यामुळे काशाच्या घरी पत्ते खेळायला गेल्यावर पोलीस धाड टाकतो त्यावेळी याच पोलीसाने आपल्या विरूद्ध साक्ष दिली होती हे जाणवल्याने तो त्याच्या गळयाला धरून त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो. अंदाधुंद न्यायव्यवस्थेमुळे डोमासारखे सराईत गुंड पुन्हा जास्त सराईत बनतात आणि गुन्हेगारी वाढतच जाते याचा प्रत्यय या कथेत येतो.

एकूणच कथेच्या आशयसुत्रांचा विचार केला असता त्या बऱ्याच अंशी वर्णनात्मक आहेत. हे जाणवते केवळ वर्णनात्मक नसून त्यांच्या कथेचे वैशिष्टये म्हणजे

बाहय सृष्टीतील वर्णनाद्वारे ते पात्रांच्या मनातील मानसिक आंदोलनाचे चित्रिकरण करतात. त्यामुळे कथेमधील वर्णने केवळ वर्णने न राहता ती त्या कथेशी एकरूप झालेली असतात. या दृष्टीने "गिधाड", "भडका" या कथेच्या सुरूवातीला आलेली वर्णने पाहण्यासारखी आहेत वर्णनातून त्या त्या व्यक्तीचा सामाजिक सांस्कृतिक आर्थिक स्तर दिसून येतो.

कथा सृष्टीच्या आशयाचे बीज विदर्भातील रसातळातला विशेषतः खेडयातला माणूस आहे. सर्वसामान्य लोकांचे जीवन परंपरा, अंधश्रद्धा, दारिद्र्य यावर शेळके प्रकाश टाकतात कथेतील "व्यक्ती" जगत असताना आपल्या परिस्थितीवर ती नाराज नसतात आहे त्यामधून मार्ग शोधण्याचा प्रयत्न अखंड प्रयत्न करीत असतात विशेषतः अर्थिक अडचणीमुळे भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यामधून येणारी हतबलता येथे केंद्रस्थानी आहे. ती मांडत असताना वैदर्भीय भाषेचा समर्थ वापर त्यानी केला आहे. कुठल्याही प्रकारच्या पाल्हाळिकपणा त्यांच्या कथेत नसून त्या सुटसुटीत विशेषतः प्रसंगाभोवती गुंफल्या गेलेल्या कथा आहेत.

**"वानगी" मधील सामाजिक चित्रण :-**

स्वातंत्र्योतर भारतातील अनेक स्थित्यंतरे झाली. ग्रामीण आणि नागर भागाच्या विकास योजना राबवल्या गेल्या. वाढती महागाई आणि भ्रष्टाचार रोखण्याचे प्रयत्नही झाले. गांधीजीनी सांगितलेला "खेडयाकडे चला" हा मंत्र काही प्रमाणात राबविला गेला. तरीही खेडयामध्ये सुधारणा झाली नाही. ती जशी होती तशीच राहिली फक्त जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले पण त्यासाठी आवश्यक असणारी साधन सामुग्री किंवा सुविधा मिळाल्या नाहीत त्यामुळे खेडी तशीच राहिली. त्यांचा फारसा विकास होऊ शकला नाही. साहजिकच दुःख, दैन्य, दारिद्र्य या गोष्टी ग्रामीण परिसरात टिकून राहिल्या या वस्तूस्थितीचे चित्रण १९६० पूर्वी म्हणावे तेवढे मराठी साहित्यात आले नव्हते. "बळी", "बनगरवाडी" सारख्या कादंबऱ्या सोडल्या तर ज्या प्रमाणात हे चित्रण यायला हवे होते ते आलेले नाही.

उद्धव ज. शेळके यांनी आपले बरेचसे कथा आणि "धग" सारख्या कादंबरीचे लेखन ग्रामीण परिसर केंद्रस्थानी मानूनच लिहिले आहे. र.वा. दिघ्यांनी प्रगल्भ केलेला प्रादेशिकतेचा प्रवाह शेळक्यांच्या लेखनात पुरेपुर जाणवतो ग्रामीण जीवन हाच केंद्रबिंदू मानून प्रस्तुत कथासंग्रहाचे लेखन त्यानी केले आहे. यामधून प्रकट होणाऱ्या समाजचित्रणाचा विचार करीत असताना प्रामुख्याने स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या खेडयात काय सुधारणा झाल्या या ऐवजी तेथील जीवन कसे जगले जाते हेच पाहणे इथे उद्बोधक ठरेल.

"वानगी" मधील जवळ जवळ सर्व कथा समाजातील खालच्या थराचे चित्रण करणाऱ्या आहेत. विदर्भात वरवर पाहता चैनीचे जीवन दिसत असले तरी शेळक्यांच्या कथामधून ते किती संघर्षमय आणि दारूण आहे याचा प्रत्यय येत राहतो. ब्रिटीश लोकांच्या पिळवणूकीचे चित्र १९६० नंतरच्या ग्रामीण परिसरातही आढळते. इथे ब्रिटीशांची जागा गावचे पाटील आणि संस्थेचे सेक्रटरी घेतात. पण पिळवणूक करण्याच्या प्रथा जवळ जवळ सारख्या आहेत "मास्तर", "दाद", "दबाव" सारख्या कथेतून याचे अनेक बारकाव्यानिशी चित्र आले आहे. "दाद" मधील बसंती, "दबाव" मधील सर्व शिक्षक वर्ग आणि "मास्तर" मधील श्रीपत मास्तर ही सारी माणसे तत्कालीन व्यवस्थेला बळी पडलेली आहेत.

आपल्यावर झालेल्या अन्यायाल वाचा फोडण्यासाठी पाटलाच्या वाडयावर गेलेली बसंती तिच्या पदरी निराशाच येते. एवढेच नव्हे तर परंपरेने चालत आलेला सवर्णाचा वर्चस्वाचा हक्क पाटलाबरोबर त्याचे मित्रही गाजवतात. आधीच गलितगात्र झालेल्या बसंतीला लुटायला मिळावे अशी त्यांची इच्छा असते तर त्याचवेळी आजीला वाटते "काहडन ओ बेटा तोंडावरचा पदर। पाटला म्होर कायची आली लाज गीज? गावचा पाटील गाववाल्या इच्या बापासागडा अस्ते बिचारे।"(पृष्ठ १०)

म्हातारीला बापासारखा वाटणारा पाटील मात्र कामुकतेने तिच्या अंगाप्रत्यंगाचे दर्शन घेण्यासाठी आसुसलेला असतो. प्रचंड विरोधाभास असलेल्या या व्यवस्थेत बसंती "दाद" मागायला जाते पण तिच्या व्यथेला कुणीही दाद देत नाही.

नेमकी हीच तऱ्हा श्रीपत मास्तर आणि शिक्षक वर्गाची झालेली आहे. बोलावल्याशिवाय कसे जायचे म्हणून संभ्रमात पडलेला श्रीपत जेवायला न गेल्याने नानासाहेब देशमुख आपला अहंकार दुखावला गेला म्हणून त्याला पाच सहा लोक खातील एवढे अन्न खाण्याची बळजोरी करतो. "दबाव" मधील शिक्षकही सेक्रटरी बदलावा ही इच्छा असतानाही काही बोलत नाहीत. सुशिक्षित होऊनही पांडे, कारंजकर सारखी माणसे सेक्रटरीचे जोडेही पुसायला मागे पुढे पाहणार नाहीत. ही वस्तुस्थिती चित्रित करत असताना आपला हा दुबळेपणा झाकण्यासाठी असे लोक वरवर गर्विष्ठ कसे वागतात याचेही प्रत्यंतर प्रस्तूत कथेते येते.

सुशिक्षित लोकांनाही आज हीन वागणूक मिळत आहे. गावचे पाटील, देशमुख पिळवणूक करतात व त्यामधून आपले वर्चस्व टिकवून ठेवतात. प्रसंगी मोठेपणाचा आव आणतात. अशिक्षितासमोर आजही भल्याभल्याची दाळ शिजत नाही. याचा प्रत्यय शेळक्यांच्या कथा वाचताना येतो. त्याचबरोबर या अन्याय करणाऱ्या लोकाना शासनव्यवस्था व न्यायव्यवस्था नेहमी पाठीशी घालत असते त्यामुळे अनेक गुंड निर्माण होतात. "मात" मधील डोमा याचीच प्रवृती आहे. गुन्हा करूनही सुटून आलेला डोमा पोलीसाची कॉलर धरायला मागेपुढे पहात नाही. तत्कालीन समाजव्यवस्थेवर केलेले हे उत्तम विडंबनच आहे. दुबळी न्यायव्यवस्था खेडयात पारंपारिकतेने टिकून राहिलेली जातिव्यवस्था गावव्यवस्था इत्यादी गोष्टींचे दर्शन त्यांच्या कथामधून घडते.

माणूस म्हटले की संघर्ष आला हा संघर्ष कधी स्वतःशी, कधी समाजाशी, कधी नियतीशी तर कधी स्वतःच्या जगण्याशी असतो. अटळ असणारा हा संघर्ष मानवी

जीवनातील एक अपरिहार्य भाग बनून जातो. खेडयात चालू असलेला संघर्ष हा उपरोक्त अनेक अंगानी सुरू होतो. पण त्यातही महत्वाचा म्हणजे जगण्याचा संघर्ष आर्थिक विषमता या संघर्षास कारणीभूत ठरते. वारंवार पडणारे दुष्काळ, बेरोजगारी, वाढती महागाई, रोगराई अंधःश्रद्धा इत्यादी अनेक गोष्टीमुळे सामान्य माणसाला दैनंदिन जीवनात पोटाशीच संघर्ष करावा लागतो.

ग्रामीण जीवनातील हा संघर्ष शेळक्यांच्या कथेचा केंद्रबिंदू आहे या दृष्टीने प्रस्तुत कथा संग्रहातील अनेक कथा विचारात येण्याजोग्या आहेत. "साधुबुवा", "आबा", "श्रद्धा", "जाणीव", "लंगडा म्हादू", "अर्धांगी", "रांडमुंड", "गिधाड", "आटापिटा" इत्यादी कथेमधून जगणे हाच संघर्ष केंद्रस्थानी आहे. यामधून निर्माण होणारे दुःख यामध्ये आहे या दुःखाला कारणीभूत असणारी तत्कालीन समाजव्यवस्थाही कारणीभूत आहे. दररोज कष्ट करून पोट भरणारे लोक त्याना वेळेवर चांगले जेवण न मिळणे, पैशाअभावी दवाखान्यात न जाता आल्याने अंगावरच आजार काढणे, मनाविरूद्ध अनेक निर्णय घेणे समाजाच्या वाईट नजरा सहन करून जगत राहणे. इत्यादी अनेक विषय त्यानी हाताळले आहेत.

या लोकाना पोटासाठीच अखंडपणे झगडावे लागत असल्याने अनेक व्यक्तिरेखा आपल्या आशाआकांक्षाना बगल देवून जगतात. कुठलेही स्वप्न उराशी न बाळगता आला दिवस घालवण्याचा विचार करणाऱ्या अनेक "व्यक्ती" येथे भेटतात. "साधुबुवा", "आबा", "श्रद्धा" मधील म्हातारी "लंगडा म्हादू" ही सारी पात्रे याच जाणिवेने जगत आहेत. आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या दुःखाची कसलीही खंत त्यांच्या मनात नाही. दुःखाचा अतिरेक कुणीही करीत नाही. त्यामुळेच म्हातारीस आपला मुलगा बरा व्हावा म्हणून स्वतःचे रक्त द्यावे वाटते. पण तिलाच पैशाअभावी मुलाला दवाखान्यात नेता आले नव्हते तर साधुबुवा बुंदा खायला मिळणार म्हणून जेवणाची इच्छा नसतानाही जेवायला उठतो.

आर्थिक कुचंबणेमुळे माणसातला माणूसपणाच संपतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'गिधाड' आणि 'रांडमुंड' या कथा आहेत. कष्टमय जीवन जगणारा भिमराव पाटील आपल्या जावायाला पाचशे रूपये उसने देतो. पण ते परत मिळविण्यासाठी स्वतःच्या मुलीला सासरचे लोक त्रास देत असतानाही तिला सासरी पाठवायला तयार होतो. एवढेच नाही तर त्याची बायको विरोध करते. तेव्हा पैसे मिळाल्यावर तिला कोण पाठवितो असे उत्तर देतो पाचशे रूपयासाठी आपल्या मुलीचे जीवन पणाला लावणारा भिमराव तत्कालीन शेतकऱ्याचे प्रतिनिधित्व करताना दिसते. कारण तो किराणा दुकानदाराची किरकोळ उधारीही परत करू शकलेला नसतो.

रूक्मा ही विधवा झालेली स्त्री आपले 'रांडमुंड' जीवन कसे तरी जगत असते. पण तरहीही समाज तिला जगू देत नाही. त्यांच्या वासनामय नजरा असहयय होतात. आपल्या मुलाला दिवाळीच्या सणाला नवीन कपडे घेऊ न शकलेली रूक्मा म्हणते, तुला बापच नाही तर त्या कर्माला मी काय करू येथे रूक्माचा संघर्ष एकाचवेळी स्वतःशी, समाजाशी नियतीशी आणि जीवनाशी आहे. यामधूनच ती जगण्याची धडपड करत असते. रूक्मा सारख्या विधवा स्त्रियांचे जीवन खूप अवघड होते. नवरा नसलेली बाई म्हणजे ती सार्वजनिक संपत्ती समजली जाते व तिच्यापासून बचाव करण्यासाठी व आपले शील जपता जपता त्यांच्या नाकी नऊ येते.

ग्रामीण जीवनाचे अनेक कंगोरे तपासणारे शेळके अनेकविध विषय हाताळताना दिसतात. 'अर्धांगी' सारख्या कथात एकाचवेळी महारोगाने उद्‌वस्त झालेला विठोबा आणि नवऱ्याशिवाय आपले काही खरे नाही असे मानून खंबीरपणे पाठिंबा देणारी त्याची बायको सखू यांच्यातील द्वंद्व उत्तमरीतीने प्रकट केले आहे. नवऱ्याशिवाय आपल्या अस्तित्वालाच अर्थ असणार नाही याची जाणीव असलेली सखू नवऱ्याला हॉस्पीटलमध्ये ठेवून स्वतःचे आयुष्य पणाला लावायचे ठरविते. याउलट परिस्थिती 'भडका' मधील संपतच्या बायकोची

आहे. बायको कुणाचा तरी हात धरून पळून गेली याचे दुःख लपविण्यासाठी तो दारू पिऊ लागतो. ग्रामीण भागातील ही संसाराची दोन चाके आहेत यापैकी एक जरी कोलमडले की दुसरे संपायला उशीर लागत नाही. याचे प्रत्यंतर प्रस्तुत कथा वाचताना जाणवत राहते.

अशाच प्रकारच्या आणखी काही कथामधून समाजजीवन आढळत राहते. आर्थिक विवंचनेपायी ब-याचदाही माणसे अंधःश्रद्धेच्या बळी पडतात त्यामुळे जीवालाही मुकण्याची वेळ त्यांच्यावर येऊन ठेपते. "डाक्तर" मधील यादोरावाचा मुलगा "पीळ" मधील सूर्या ही माणसे दवाखान्यात जाण्याऐवजी इतरच उपाय करत राहतात तर "श्रद्धा" मधील बायको मटण शिंक्यावरून खाली पडले म्हणून ते नव-याला खाऊ देत नाही. परिस्थितीमुळे कधीतरी आणलेले मटणही आपण खाऊ शकत नाही म्हणून चिडलेला नवरा दारूच्या नशेत तिला मारू लागतो. या सा-या व्यक्ती एका अर्थाने दारिद्रयाला कंटाळलेल्या असतात दारिद्रयावर मात करत जगताना मात्र ती मागे वळून पहात नाहीत .

"वडवानल" व "उमेद"सारख्या कथेमधून विक्षिप्त किंवा ज्याना आपण वेडे म्हणतो अशांच्या मानसिक आंदोलनाचे चित्रण कथाकार करताना दिसतो थोडासा विनोद, थोडेसे गांभीर्य आणि याच्या तळाशी दडलेली दुःखी व्यथा यांचा सुरेख मेळ या कथांमध्ये झाला आहे. वरवर शांत वाटणारी ती आणि मामा यांच्या आयुष्यात मोठे वादळ निर्माण होऊनही ती उमेद हारत नाही. मामाला पन्नाशीनंतर ब्राहमण वधु मिळेल अशी उमेद असते तर "ती"ला आपल्या होणा-या आपत्याची भीती नसते. व्यथांना कुरवाळत बसण्यापेक्षा ही माणसे आपल्या परीने जीवनात रस शोधण्याचा प्रयत्न करतात शेवटी पदरी निराशाच येते.

शेळक्यांच्या कथामधून ब-याचदा विधवा स्त्रिया आणि विधूर पुरूषांचे

चित्र येते. कौटुंबिक ताणतणाव ते फारसे चित्रित करीत नाहीत. हे चित्र त्यांच्या अनेक कथेत आलेले आहे. "आटापिटा" या कथेत एका विधवेला एक मुलगा आणि मुलगी आहे. मुलाचे लग्नाचे वय वाढत चालेले आहे घरात दुसरे बघणारे कोणी नाही त्यामुळे तिचा मुलगा शिवरामच लग्नाची खटपट करतो पण ती व्यर्थ ठरते साठंलोट हा जो ग्रामीण भागातील प्रकार आहे तसा प्रयत्न शिवराम करीत असतो पण त्याच्या बहिणीला बघायला आलेल्या पाहुण्याना ती पसंत पडत नाही. याचा परिणाम व्हायचा तोच होतो दोघांचेही लग्न ठरत नाही पण कौटुंबिक ताण म्हणावे तितके चित्रित होत नाहीत.

"वानगी" मधील कथा घटनाप्रधान आहेत एखादया प्रसंगाच्या माध्यमातून जीवनातील कारूण्य उलगडून दाखवले जाते हे उलगडून दाखवत असताना त्यांच्याकडे जी डोळस दृष्टी आहे तिचा पुरेपुर फायदा घेतात केवळ घटना वर्णन न करता त्या घटनेच्या पाठीमागे असणारे व्यक्तीचे अंतर्विरोधही चित्रित करतात त्याचबरोबर घटनांच्या माध्यमातून सामान्य लोकांच्या जीवनाचे अनेकांगानी संपूर्ण दर्शन घडवतात एकूण कथासंग्रहाच्या आधारे जीवन तपासावयास सुरूवात केली तर लक्षात येते की या संग्रहामधून ग्रामीण भागात संग्रहित झालेले सामान्य जनाचे जीवन अनेकविध अंगाने प्रकट झालेले आहे "डाक्तर", "धंदा"सारख्या कथेत पोटासाठी धडपडणारी माणसे भेटतात वेळोवेळी पदरी अपयश येऊनही ती आपापल्या धंदयाशी प्रामाणिक राहतात. प्रसंगी उधारी देतात हे सगळे करत असताना आपल्या सर्व निष्ठा ते धंदयात पणाला लावतात. म्हणून सोमा डॉक्टरकी बरोबर अनेक उद्योग करतो. तर "धंदा" मधील सखारामची हॉटेल चालवण्याची व चहा करण्यासाठी कराव्या लागलेल्या आटापिटयाची वागणूक पाहून त्याची निष्ठाही दिसते आणि धडपडही दिसते याचबरोबर पाटील, कामगार, सरकारी कामावर जाणारे लोक, खेडयातील कुटुंब इत्यादी अनेक विश्व अंगाचे चित्रण त्यांच्या कथामधून दिसते.

आयुष्यभर आईने कष्ट करून तिला सुख न मिळाल्याने एकाकी बनलेला

'जाणीव' मधील वामन अस्वस्थ होतो. 'ताठा' सारख्या कथेत सासू आणि सून यांच्यातील संघर्ष चित्रित केला आहे.

समाजजीवनाचा छेद घेत असताना शेळके केवळ बाहय चित्रणावर भर देत नाहीत. माणसाच्या मनातील अंतर्विरोध ते टिपताना दिसतात मानवी मनातील द्वंद्वाचे चित्रण करीत असताना ते बाहय वर्णनाचा आधार घेतात उदा. 'रांडमुंड' मधील रूक्माकडे लागट नजरेने बघणा-या सखाचा तिला राग आलेला असतो त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे, 'रूक्मीच्या छातीकडे बघत असलेला सखा लागट हसला त्याच हाव-या नजरेने तिला वरपासून खालीपर्यंत न्याहळू लागला रूक्माच्या घमेल्याचा आवाज झालाच. झटक्यासरशी रवल्या गेलेलं घमेल हालवत लोमकळत ती तेथून निघून गेली'(पृष्ठ २१७).

या वर्णनातून जाणवते की, रूक्मा आपला राग प्रत्यक्ष व्यक्त न करता ती घमेलाच्या आवाजाच्या रूपाने व्यक्त करते. यासारखी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत. भिमरावचे बाहयवर्तन आणि कामगारावर खेकसणे म्हणजे त्यांच अंतर्मनातील द्वंद्वाचेच प्रतीक वाटते म्हणून मुलीला सासरी पाठविताना तो घरात जात नाही.(गिधाड)

'वानगी' मधून संपूर्ण खेडे व्यक्त झाले आहे. असे म्हटल्यास वावगे ठरू नये. खेडयातील दलित-सवर्ण भेद (दाद) शेती संस्कृतीचे चित्र (गिधाड, लंगडा म्हादू) जीवनाशी चाललेला संघर्ष (साधुबुवा, आबा) नियतीशी करावा लागणारा संघर्ष (आटापिटा, अर्धांगी) पिळवणूकीचे चित्र (मास्तर, दबाव, गिधाड) आर्थिक ताणतणाव (श्रद्धा, जाणीव, पीळ) विधवा स्त्रीचे दुःख (रांडमुंड, पीळ) इत्यादी अनेक ग्रामीण अंगाचे जीवनदर्शन प्रस्तुत संग्रहात घडते. त्याचबरोबर 'धंदा', 'डॉक्तर', सारख्या कथेमधून अंधःश्रद्धा व्यवसाय आणि संघर्ष यांचे चित्रण येते.

माणसा माणसा मधील ताणतणाव, हेवेदावे, लोभ, माया, मोह मत्सर यांचेही चित्रण कथेमधून आलेले आहे. या दृष्टीने आबा, भिमराव (गिधाड) सोमा (डाक्तर) संपत (भडका) सखाराम (धंदा) इत्यादी व्यक्ती उल्लेखनीय आहेत. माणसामधील संबंध रेखाटताना कुठेही आक्रस्ताळेपणा येत नाही. सारी पात्रे नैसर्गिकरित्या जगताना दिसतात आपणाला भोगावे लागणारे दुःख हे एखादया जखमेसारखे आहे. असे भासवून घेत जगत राहतात एकाकीपणा, अस्वस्थता, दुःख, दैन्य, दारिद्र्य हे सारे पदरी असूनही ही माणसे शांतपणे जीवन जगतात. कुठेही ही आक्रमक बनत नाहीत किंवा मोडून पडत नाहीत. कधी कधी संयम राखूनच असतात. मास्तर, लंगडा म्हादू, आबा, सारख्या विधुराचे दुःख रेखाटताना शेळक्यांची शैली कधीही संयम सोडत नाही. बाहयचित्रणाद्वारे त्यांच्या दुःखाला अधिक बोलके बनवले जाते.

ग्रामीण जीवन चित्रित करत असताना त्यांनी वैदर्भीय बोलीचा समर्थपणे वापर केला आहे. मूळातच गोडवा असलेल्या या भाषेत शेळके अनेक रंग भरतात. त्यामुळे समाजचित्रणाला अधिक गहिरे परिमाण लाभले आहे. निवेदनाची भाषा आणि बोलीभाषा यांच्या माध्यमातून त्यानी आपले अनुभव उत्कटतेने साकार केलेले आहेत. भाषेच्या वापरा बरोबरच त्यानी वातावरणनिर्मिती करताना आसपासच्या परिसराची वर्णने केली आहेते ती ही वास्तव वाटायला लागतात. तो प्रदेश जिवंत होताना दिसतो. "भडका" या कथेतील संपतच्या घराचे वर्णन पहा, "चिमणीच्या उजेडात संपतच पोरक माजघर उघड पडल सामानासुमानाची जागा सोडून उरलेल्या जमीनीवर धुळीचा पातळ थर होता. त्यावर संपताची पावल उमटत होती सगळीकडे विडयांची थोटकं व जळक्या काडया पडल्या होत्या चुलीच्या परोळयात घमेलभर राखाडीचा ढीग आग आगुटून बसला होता काही राख असहय अवस्थेत पडून होती."(पृष्ठ ३३)

वरील वर्णनातून बायको निघून गेल्यामुळे घराच्या बेवारस स्थितीचा प्रत्यय

येतो. त्याचबरोबर संपतच्या अस्वस्थ मनःस्थितीचेही पडसाद त्या वातावरणात भारून राहयल्यासारखे वाटतात अशी उदाहरणे प्रस्तुत कथासंग्रहात अनेक ठिकाणी आले आहेत. विशेषतः "डाक्तर", "धंदा" या कथेतील वर्णने या दृष्टीने उल्लेखनीय आहेत..

विदर्भाच्या समाजजीवनातील आशयाची अभिव्यक्ती करीत असताना वापरलेली भाषा वातावरण निर्मिती, जीवनदर्शनाची व्यापकता या गोष्टीमुळे त्यांच्या कथा वैशिष्टयपूर्ण ठरल्या आहेत.

कथेमधून प्रतीत होणा-या समाजजीवनाचा आवाका फारच विस्तृत असलेला दिसतो. हा आवाका ग्रामीण विशेषतः विदर्भाच्या प्रदेशाचे चित्रण करणारा आहे ही भूमिका गृहित धरूनच वरील विधान करावे लागते. पाठीमागे मांडलेली संपूर्ण खेडयाची संकल्पना प्रस्तुत कथासंग्रहात संग्रहित झालेली आहे. अनेकविध परिमाणे असलेल्या या कथामधून व्यक्ती-समाज-निसर्ग-नियती हा संघर्ष केंद्रस्थानी असल्याचे आढळते त्यामुळे या कथाना मर्यादित स्वरूप न राहता व्यापकता प्राप्त होते. घटनाप्रधान असणा-या या कथांमधून प्रमुख संघर्ष आहे तो जगण्याचा. त्यामुळे जीवनात निर्माण होणारी दुःखे ही माणसे आनंदाने झेलत राहतात. त्याना सामोरी जातात. प्रसंगी जीवनाची बाजी लावतात.

ग्रामीण भाषेची आणि परिसराची डुब असल्यामुळे या कथांना आणि त्यामधून प्रतीत होणा-या समाजवास्तवाला गहिरे परिमाण लाभलेले आहे. हेच शेळक्यांचे कथेचे महत्वाचे वैशिष्टय मानायला हरकत नाही.

**"वानगी" मधील स्त्रीजीवन :-**

१९६० नंतरच्या पिढीतील उद्धव ज. शेळके एक महत्वाचे कथाकार आणि कादंबरीकार आहेत. बदलत्या ग्रामीण पार्श्वभूमीचे डोळसपणे चित्रित करणारे लेखक म्हणून

शेळक्यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी लेखन करताना प्रामुख्याने ग्रामीण भागातील खालच्या थरातील लक्ष केंद्रीत केले. त्या थरातील सामाजिक, आर्थिक जीवन कसे आहे. याचा वेध कसोशिने शेळके घेतात. हा शोध घेताना कुठेही तकलादूपणा किंवा वरवरचे वास्तवचित्रण नसते. तर त्यांच्या कथेत एक प्रकारचा सखोलपणा आहे. परिस्थितीच्या आणि माणसाच्या खोल गाभ्यापर्यंत ते पोहचण्याचा प्रयत्न करतात. यातूनच त्याना स्त्रियांची दुःखें जाणवली आहेत. भारतीय परंपरेत आजही स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व नाही. लहानपणी आई, वडील, तरूणपणी नवरा आणि म्हातारपणी मुले याच साखळीत जखडून जीवन जगावे लागते. याचा परिणाम ग्रामीण भागातील स्त्रीवर एवढा झालेला आहे की नवरा आणि मुलाशिवाय आपले अस्तित्वच पूर्ण होऊ शकत नाही. ही भावना त्यांच्या मनात असते या भावनेपोटी होणारे अन्याय, अत्याचार मुकाटपणे सहन करतात व हे स्त्रियांचे व्यथित विश्व शेळक्यांना खुणवते. स्त्रियांची ही दुःखे त्यांनी कथा आणि कादंबरीत मांडली आहेत या दृष्टीने त्यांच्या "धग" आणि "लेडिज होस्टेल" सारख्या कादंब-या पाहण्यासारख्या आहेत.

कथेच्या माध्यमातूनही त्यानी स्त्रियांच्या या व्यथा मांडलेल्या आहेत. अनेक अंगाने स्त्री जीवनाचे चित्रण शेळके करताना दिसतात यामध्ये विधवा स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. सासू-सुनामधील संबंध, नवरा बायको मधील स्त्रीची भूमिका, अन्यायाने अत्याचाराने पीडलेली स्त्री अशा अनेक स्त्रियांची दुःखे त्यांनी चित्रित केली आहेत.

प्रस्तुत संग्रहातील "दाद", "जाणीव", "अर्धांगी", "पीळ", "वडवानल", "ताठा", "रांडमुंड", "आटापिटा", "गिधाड" इत्यादी कथांमधून स्त्रीजीवनावर प्रकाश टाकला आहे. पैकी "रांडमुंड", "पीळ", "जाणीव" या कथेतील स्त्रिया विधवा आहेत. "रांडमुंड" मधील रूक्मा नवरा मेल्यानंतर पोटासाठी सरकारी कामावर मजुरीसाठी जाते तेथील पुरूषांच्या वासनामय नजरा सहन करीत काम करते. प्रत्येकजण तिलाच काम सांगत असतो पण ती मुकाटपणे सहन करते. त्याशिवाय तिला पर्यायही नसतो. तिच्या

या असहय मनःस्थितीचे वर्णन करताना लेखक लिहितो "आणि त्या निगरगट्ट आवाजाला जन्म देणारे तांबडं तरूण तोंड फिसकन हसलं जेवढ ते तोंड हसल त्याच्या कितीतरी पटीने रूक्माची मुद्रा गंभीर झाली. या गांभीर्याने रूक्माला न कळत तिच्या शीलाभोवती कवच उदभवले नंतर त्या घमेल भरणा-याला कळाव या हेतूने रूक्माचे डोळे त्याच्यावर फिरून आले दरडावून आले" (पृष्ठ २१६) यापेक्षा जास्त तो काहीही करू शकत नाही. दिवाळीच्या सणाला आपल्या एकुलत्या एक मुलाला नवीन कपडे घेण्याचा खूप आटापिटा करते. पण तिला ते शक्य होत नाही. सखाराम मुद्दामहून तिला उसने पैसे द्यायला तयार होतो. पण रूक्मा ते पैसे घेत नाही. कारण त्या पाठीमागची भावना काय आहे. हे तिला पक्क माहीत आहे. शेजारच्या मारत्याला नवीन कपडे घेतले म्हणून फुगलेल्या जन्याला म्हणते, "आनूड आनलीत त्या बिचा-याले बाप आये मून त्याने आणली तूहं त करम अस दलिंदर आहे लेका त्याले मी तरी काय करू आन तू तरी काय करसीन, सांग" आणि पुढ न बोलवण्याने रूक्माने जनयाला जरा आणखी पोटाशी ओढून घेतले त्याच्या 'उघडया' पाठीवरून हात कुरूवाळू लागली.(पृष्ठ २२८) कथा इथ संपते आणि रूक्माची जखम भळभळून वाहू लागते.

"पीळ" कथेतील म्हातारी मुलगा आजारी आहे. पण त्याला दवाखान्यात नेऊ शकत नाही. एकीकडे आर्थिक चणचण, वैधव्य आणि दुसरीकडे अंधःश्रद्धा या पकडीत सूर्या जास्तच आजारी पडतो. तिला बघणारे आणि मदत करणारे कुणीही नाही. त्यामुळे सूर्याचा मित्र केशव दवाखान्यात न्यायला लावतो तेव्हा टांग्यात त्याचे ओझे झेपत नसतानाही तिला धरून बसावे लागते. एकीकडे स्वतः आजारी व निराधार असलेली म्हातारी त्यालाही व्यवस्थित आधार देवू शकत नाही. डॉक्टर त्याला रक्त भरण्याच्या गोष्टी करू लागतात. तेव्हा तळमळत्या सुरात ती म्हणते, "मग माहयावाल रगत ध्यान काढून"(पृष्ठ १४१) मुलासाठी तीळतीळ तुटणारा जीव नंतर आपण निराधार होऊ याची भिती आणि समर्पणशीलवृती या सा-यामुळे हीच्या हृदयाला पडलेला पीळ म्हणजे ही कथा. या कथेतून निराधार

स्त्रीची व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या व्यथा भोगत असताना तिच्या मनात कसलीही खंत नाही. आहे हे असे आहे त्याशिवाय पर्याय नाही. हे त्या म्हातारीला माहीत असल्याने ती रक्त द्यायला तयार होते.

अशाचप्रकारे वामनला लहानाचे मोठे करणारी विधवा स्त्री "जाणीव" मध्ये भेटते. आयुष्यभर कष्ट उपसत ती वामनचा सांभाळ करते स्वतः आजारी असताना वामन जी काळजी घेतो ती पाहून तिला आपले दुःख हलके वाटायला लागते तरीही काळजीने ती त्याला वेळेवर घरी येण्यास सांगते. एकाकी जीवन जगणाऱ्या मायला वामनही सुख देवू शकत नाही म्हणून आपल्या मित्राजवळ तो म्हणतो, "माहया बुढीन आल्या जल्मात कोनाच सुख नाई पायले. बिचारीन माहया बापाच्या वक्तापासून सार रा जल्मभर थे लोकाईचे काबाडकष्ट करत आली मी पायलो थोई हया असाच" हीच जाणीव वामनला अस्वस्थ करते व त्याच्या मायचे दुःख बोलके होते.

"अर्धांगी" या कथेतील सखू आपल्या नवऱ्याला दवाखान्यात घेऊन चालली आहे या घटनेनी कथा सुरू होते. नवऱ्याला कुष्टरोग झाला आहे. त्याची बोटे रक्ताळली आहेत पण बोटे फुटल्याचे त्याला भानही राहत नाही त्या बोटाला चिंधी बांधण्यासाठी सखू स्वतःच्या अंगावरील साडी फाडून बांधते त्यावेळचा विठोबा आणि सखूमधील संवाद पहा,
"दवाखान्यापावतर जाईठावरक थे लुगड ठिवसीन आंगावर का करसीन त्याच्या चिंध्या?"
"होऊ झाल्यात लेकाले। जिवाईपरस लुगडयाले किमत आये? मग तू खूप झाली मनाव लेक..."

यस संवादामधुन विठोबाला परिस्थितीने किती घायाळ केले आहे हे दिसते पण सखूला नवरा महत्वाचा वाटतो. स्त्रीच्या समर्पणशीलवृतीचे दर्शन सखूच्या व्यक्तिमत्वामधून

दिसून येते. विठोबाला महारोग झाला आहे. हे समजल्यावर विठोबाशिवाय चार वर्षे काढण्याची तयारीही ती दर्शविते. नव-याशिवाय या समाजात आपणाल कोणी विचारणार नाही याची तिला खात्री असल्याने ती कष्ट करण्यास तयार होते व नव-याला बरी करण्यासाठी चार वर्षे दवाखान्यात ठेवण्याचा निर्णय घेते.

बसंती ही दलित समाजातील मुलगी आहे. दिसायला सुंदर आहे. पण घरात फक्त तिची आजीच आहे. याचा फायदा सवर्णाचा देव्राव घेतो तिच्यावर बलात्कार करतो अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ती 'दाद' मागायला गावच्या पाटलाकडे जाते पण पाटील तिच्या अन्यायाला 'दाद' देण्याऐवजी तिच्या सौंदर्यालाच 'दाद' देतो एवढेच नाही तर ते पाहण्यासाठी तो आटापिटा करतो. तिला देव्रावने कसे आणि काय केले हे सांगावयास लावतो तिला दम देवून म्हणतो, 'मग होईन बोंबलन आधी लुगडयात खोसलेल्या थ्या झंपरच्या चिंध्या काहाड बाहीर सांग काहाडत का नाही लवकर?' .... आणि बसंतीचा सुर आवरत नव्हता अधिक अधिक वाढत होता."

यावरून 'दाद' मागायला गेलेली बसंती अधिकच हतबल झालेली दिसते. पण तिचे काहीही चालत नाही. आजीही हे सारे मुकाटपणे सहन करते. हा तमाशा बघायला बरेच बघे जमतात. याची तमा पाटलाला नसते. एकूणच स्त्रीवर अन्याय करायचा हेच तत्व मनाशी बाळगलेले असते. तिच्या अब्रूचाही विचार होत नाही. आपल्या अगोदर देव्रावने नंबर लावला याचे पाटलाच्या मित्राना वाईट वाटते ही वस्तूस्थिती आहे. हतबल झालेल्या स्त्रीचे चित्रण उद्धव ज. शेळके तटस्थपणे करतात. यात कुठेही भाषा किंवा प्रसंग अश्लील बनत नाहीत. त्यामुळे त्यांच्या स्त्री व्यक्तिरेखा अधिक उठावदार आणि परिणामकारक बनतात.

सासू आणि सुनांच्या संबंधावर प्रकाश टाकणारी 'ताठा' ही कथा आहे.

सासू जोपर्यंत ठणठणीत असते तोपर्यंत तिची जागा कोणीही घेऊ शकत नाही. सुना सगळे गप्प ऐकून घेतात यामुळे काही अंशी सासूच्या मनात "ताठा" निर्माण झालेला असतो पण ती जेंव्हा एका जागेवर बसते तेव्हा मात्र सुना तिला विरोध करू लागतात हा विरोध "ताठा" मधील आजीला सहन होत नसे. रागाने ती दिवसभर घराबाहेर पडत असे. पण संध्याकाळी तिला परत येण्याशिवाय पर्याय नसतो. तरीही तिची ताठर भूमिका कायमच असते आणि सुनांचीही तीच भूमिका असते.

"वडवानल" मधील स्त्री घरच्या अन्यायाला बळी पडून वेडी झाली आहे. तिच्या चुलत्याने तिला मोठया घरी देतो म्हणून नांदत्या ठिकाणाहून आणले आणि गावी आणून नको ते उद्योग करायला लावले. तिच्या वाटयाची जमीन हिसकावून घेतली म्हणून ती वेडी बनली आहे. संधीसाधू प्रवृत्ती अशाप्रकारे स्त्रियांच्या भांडवल म्हणून उपयोग करताना दिसतात. तरीही स्त्रियांना हे सारे मुकाटपणे सहन करावे लागते.

"गिधाड" ही कथा स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचे उत्तम प्रतीक आहे. भिमराव पाटील आपल्या जावयाकडून पैसे वसूल करून घेण्यासाठी मुलीला त्रास होत असूनही सासरी पाठवितो. सासरी तिला उपाशी ठेवले जाते. मारहाण केली जाते तरी ती बिचारी सारे मुकाटपणे सहन करते. एकीकडे सासरची मंडळी त्रास देतात म्हणून ती माहेरी आलेली आहे. तर माहेरी आल्यावरही बाप पैसे वसूल करण्यासाठी तिला परत पाठवितो तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करणारी ती काहीही करू शकत नाही. तिची आई कासाबाई तिला पाठवू न देण्याचे ठरवत असते. त्यावेळी भिमराव जावयाला म्हणतो, "आन एक समजा, तुम्ही म्हाया लेकीले कितीही मारझोड केली, तिच्या जीवाले कितीही सासुरवास असला तरी आता तिच्यावर माही कोन्ती सत्ता राहयली? बामनाला देल्ली गाय आन तिची आशा काय। थे जाने, आन तिच तगदीर जाने"(पृष्ठ २५१)

या उता-यावरून परंपरेने स्त्री पिचली जात आहे हे कळत असूनही कुणी काही करू शकत नाही. याची जाणीव भिमरावच्या बोलण्यातून दिसून येते. सासरी केला जाणारा अत्याचार स्त्रीने मुकाटपणे सहन केलाच पाहिजे ही अलिखित भारतीय परंपरा अनेकांचे संसार उद्ध्वस्त करताना दिसते.

मैना आणि कोंडबा दारिद्र्यावर मात करीत कसे तरी जगत असतात. मैना दिवसभर नव-यासारखे कष्ट करून येत असते. तरीही त्यांच्या दोघांच्या कष्टावर पोट भरत नाही हा 'श्रद्धा' चा आशय आहे नव-याने विकत आणलेले मटण शिंक्यावरून पडले म्हणून कुत्र्याला घालणारी मैना कोंडबाचा खूप मार खाते पण ती त्याला काही सांगत नाही मुकाटपणे मार सहन करणारी मैना पारंपारिक भारतीय स्त्रीचे प्रतिनिधीत्व करणारी वाटते.

'आटापिटा' मध्ये शिवरामला बाप नसल्याने त्याचे लग्न ठरत नाही विधवा आई काहीही करू शकत नाही शिवरामने मुलीसाठी आणलेले बिजवराचे स्थळ ती मान्य करते नवरा मेल्यामुळे आपल्या आशा, स्वप्न सारी ती गुंडाळून ठेवते व शिवरामच्या म्हणण्यानुसार ऐकत राहते पण एवढा आटापिटा करूनही त्यांचे लग्न ठरत नाही. ही वस्तुस्थिती सर्व घराला हतबल बनवते.

अशाप्रकारे 'वानगी' मधून दिसून येणारे स्त्रीजीवन अनेक अंगाने विकसित झालेले आहे तत्कालीन कुटुंबाची परंपरा आणि त्यामध्ये पिचलेली स्त्री त्यांच्या अनेक कथेत साकार झाली आहे. विधवा स्त्रियांची दुःखे कुठलाही भावनिक वापर न करता अतिशय तटस्थपणे शेळके साकार करतात आर्थिक आणि पारंपारिक सामाजिक परिस्थितीत पिचली गेलेली आणि तरीही तेच खरे जीवन आहे असे मानून जगणारी स्त्री इथे आहे. ख-या अर्थाने ग्रामीण स्त्री शेळके रंगवताना दिसतात. त्यांच्या जीवनातील अनेक धागेदोरे हळूहळू

उलगडत जातात या स्त्रिया दुःख भोगताना कुठेही दुःखाचा बडेजाव करीत नाहीत जात्याच त्यांच्यात असणारी समर्पणशील वृती अधिकच श्रद्धाळू आणि त्यागी बनत जाते. त्यामुळे त्यांच्या जीवनाला सामाजिकतेचे अनेक संदर्भ प्राप्त होतात.

सासू, आई, सून, बायको, बहिण, विधवा स्त्री, अशपृश्य स्त्री, वृद्ध स्त्री, एकाकी स्त्री, अशी स्त्रियांची अनेक रूपे या कथामध्ये दिसून येतात त्यामुळे भारतीय खेडयातील स्त्रीजीवन ब-याचअंशी चित्रित झाले आहे. साहजिकच ग्रामीण परिसरातील या स्त्रीजीवनाला विदर्भाच्या भाषेचा गोडवा असल्याने ते अधिकच उठावदार बनले आहे. त्यामुळे एकंदरीत स्त्री व्यक्त करण्यात उद्धव ज. शेळके याना बेस्च यश आलेले आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

**"वानगी" ची भाषाशैली :-**

अगदी सुरूवातीला शैलीचा विचार बाहयांगाने होऊ लागला त्यामुळे अलंकार सदृश्य रचना म्हणजे शैली अशी मांडणी प्राचीन साहित्यशास्त्रात होत होती पण हळूहळू तो दृष्टिकोण बदलला. आधुनिक साहित्यशास्त्रात भाषेचा अंतःस्तराचाही विचार शैली शास्त्रात होऊ लागला. त्यामुळे प्रत्येक कालखंडाची, लेखकाची पंथाची शैली वेगवेगळी असते हे तपासता येऊ लागले कारण style is the men हा विचार पुढे आल्याने प्रत्येक व्यक्ती आपली शैली एका मर्यादेपर्यंतच विकसीत करू शकतो. त्यामुळे त्यांची शैली कशी आहे किंवा असू शकते, हे आपण भाषेच्या बाहय आणि अंतःस्तरावर तपासून मांडू शकतो साहजिकच प्रत्येकाची शैली स्वतंत्रपणे विकसित होऊ शकते.

उद्धव ज. शेळके हे अलीकडच्या नवकादंबरीकार आणि नवकथाकारांच्यात मोडतात. त्यानी विदर्भातील जीवन चित्रित करत असताना वैदर्भीय बोली भाषेचाच वापर

वापर केला आहे. त्यामुळे 'वानगी' मधील त्यांची शैली तपासताना भाषेच्या दोन पातळीवर वापर केला आहे. हे लक्षात घ्यावे लागते.

१) निवेदनाची भाषा

२) संवादाची भाषा

शेळके यांची निवेदनाची भाषाशैली नागर आहे. त्यामुळे ती प्रमाणभाषेकडे जास्त झुकणारी आहे. पण तरीहो त्यानी निवेदनात बोलीतील शब्द बेमालूपणे मिसळले आहेत. भाषा आणि बोली यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न त्यानी केलेला आहे. पुढील उतारा पहा,

"महारवाडयातल्या आपल्या सडलेल्या गवताच्या खुराडयात बसंती कुडाला टेकल्या न टेकल्यागत बसली होतं. आजीन तीनदा सांगूनही ती पावसाच्या ओसाडीन ओलावलेल्या जमीनीवरन सरकत नव्हती छातीवर लोंबकळणा-या चिखलाचे तळवे उमटलेल्या "लुगड" नावाच्या चिंधुकाच्या चिंध्या झाकण्यासाठी बसंतीन आपले गुडघे पोटाशी उभवले होते. त्यांचा व स्वतःचा तोल सावरण्यासाठी त्याभोवती आपल्या हाताच्या आळयाची घट्ट मिठी आवळली होती"(पृष्ठ १)

या उता-यातील खुराडयात, कुडाला, ओसाडी, ओलावल्याली, चिंधुक, चिंध्या, उभवणे, आळयाची इत्यादी शब्द अस्सल ग्रामीण शब्द आहेत. याची बेमालूम मिसळ त्यानी निवेदनाच्या भाषेत केली आहे. निवेदनातून ते एखादा प्रसंग तसाच्या तसा साकार करतात प्रस्तुत उता-यातील बसंतीच्या घराचे आणि मनःस्थितीचे वर्णन हुबेहुब उतरले आहे. तिच्या मानसिक अवस्थेचे चित्रण म्हणजेच झोपडीचे चित्रण वाटते. एवढेच नव्हेतर शेळके ब-याचदा मानसिक द्वंद्व बाहयवर्णनातून व्यक्त करतात. "गिधाड" मधील भिमरावचे शेतात आणि घरात वागणे म्हणजे त्यांच्या आर्थिक चणचणीचे पडसादच वाटतात. दुकानदार, कामाला आलेल्या बायका, गणपा आणि इच्छा नसतानाही आपल्या मुलीला सासरी पाठविणे

म्हणजे त्यांच्या आंतरिक द्वंद्वाचे प्रतिबिंब वाटते. याचेच उत्तम उदाहरण म्हणजे 'भडका' ही कथा आहे. त्यातील पुढील वर्णन पहा,

"धांडयाचा जाळ पुन्हा भडकू लागला तरीही संपत बाजूच्या पेंडक्यातले मूठमूठ धांडे उचलून चुलीत घालत होता ते भडकत होते. चुलीवरच्या गंजातल पाणी कधीच आटून गेल होत. जाळ सुरूच होता. त्यामुळे चुलीवरचा गंज क्षणाक्षणाला मोडीतल्या भांडयासारखा वाकत होता. झाकणीच होत होतं संपत जाळ लावत होता"(पृष्ठ ४०) बायको पळून गेल्याचा राग आणि तो मारतीने डिवचला म्हणू त्याचा भडका शेळके अशारीतीने बाहयवर्तनातून व्यक्त करतात हे त्यांच्या भाषा शैलीचेच विशेष आहे.

त्याचबरोबर ते जाणूनबुजून भाषेचे काही नवीन प्रयोगही करतात, 'तेवढयात अंगणातील चाहूल ओसरीत आली दारात डोकावून तिसऱ्यांदा की चौथ्यांदा ओरडली' (पृष्ठ ३५) "संपतन आपल्यात झाडण्याचा आवेश भरला" (पृष्ठ ३४) "सखूच हे सार होत असताना तिची जाणीव विठोबा गेला त्या दवाखान्याच्या दाराभोवती पहारा करीत होती."(पृष्ठ १०८)

"जराशान दवाखान्याच्या दारातून विठोबा लोटून लावल्यासारखा बाहेर पडला"(पृष्ठ १०८)

वरील अवतरणातील चाहूल ओसरीत येणे झाडण्याचा स्वतःत आवेश भरणे. जाणिवेचा पहारा असणे लोटून लावल्यासारखे धाडस भरवणे इत्यादी मांडणीमधून पारंपारिक अर्थांना छेद देवून व शब्दांचे संदर्भ बदलून मांडणी केली जाते. त्यामुळे प्रस्तुत अवतरणाचे अर्थ कथेत शोधावे लागतात.

संवादाची भाषा वैदर्भीय असल्याने तिला अधिकच गोडवा प्राप्त होतो. प्रादेशिक जीवन चित्रित करीत असताना तेथील भाषेचा वापर केल्यास ते अधिक परिणामकारक ठरत असते तसा प्रयत्न 'वानगी' मध्ये केला असल्याने कथा अधिक परिणामकारक आणि उठावदार बनल्या आहेत. 'दाद' मधील पाटलाला बसंतीचे अंगांग न्याहळण्यास

मिळत नाही आपले ती ऐकत नाही आणि पाटीलकीचा अधिकार या सा-यांचे भाव त्यांच्या खालील एकाच संवादातून व्यक्त होतात. "थे तशी कुत्तीगा तोंड उघडाले गेली. जेव्हा थ्या बाजाच्या हाताचे फटके बसतीना ×× वर तवा उघडन थे आपल तोंड - तवरी नाई बाज्या अबे बाज्या, कुठ मेला काय भोसडीच्या?" (पृष्ठ १०)

क्रियापदाचा कमीत कमी वापर असलेली व वाक्याच्या मध्येच क्रियापदाची मांडणी असल्यामुळे विदर्भाची बोली फार परिणामकारक वाटते. तिचा वापर करताना शेळके अतिशय सूक्ष्म रीतीने वापर करतात. "तुमचा जीव आये त इस्टनच आये माहयावली तुमी लेकराबायाईची कायी कायजी नो का करू। माझ्या जीवात जीव आये तवरी मी त्याईले उपासी नाई मरू देत" (पृष्ठ ११४) यामधूनच क्रियापदाची रचना संवादात कशी बदलते हे लक्षात येईल. त्यामुळे संवादाच्या भाषेला अधिकच गोडवा प्राप्त होतो. संवादाची आणि निवेदनाची भाषा वापरत असताना ग्रामीण भाषेचा बाज निवेदनाच्या भाषेला दिला असल्याने व मूळची गोडवा असलेली वैदर्भीय बोली वापरल्याने भाषा अधिकअधिक उठावदार बनते त्या प्रदेशाची भाषाही समर्थपणे वापरल्यामुळे व जीवनही प्रादेशिक असल्यामुळे तो एक प्रादेशिक कथासंग्रह आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. भाषा तर निश्चितपणे प्रादेशिकतेचे लेणे लेऊन आलेली आहे.

**समारोप :-**

प्रस्तुत प्रकरणात 'वानगी' या कथा-संग्रहाचा सर्वांगीण विचार करत असताना आशयसूत्रे, समाजचित्रण, स्त्रीजीवन आणि भाषाशैली या अंगानी केला आहे. विदर्भातील खालच्या थरातील लोकांचे जीवन चित्रित झालेले असल्याने खरा विदर्भ नजरेत येतो. वरवरून सुखवस्तू वाटणारा हा परिसर अंतरंगात किती पिचलेला आहे. हे या कथासंग्रहावरून लक्षात येते. त्यांच्या कथेतील पात्रे दुःख भोगण्यासाठीच जन्माला येतात. त्यामुळे दुःख एक जीवनाचाच भाग आहे असे समजून ती जगत राहतात. साहजिकच त्याना कसलीही

खंत नसते. प्रत्येक कथा एखादया वर्णनाने प्रसंगाची सुरूवात करते आणि दुःखाची खरी सुरूवात कथा संपल्यावरच सुरू होते. हे ही त्यांच्या कथेचे जाणवलेले एक वैशिष्टये आहे.

त्यांच्या कथांची शीर्षकेसुद्धा परिणामकारकच आहेत. प्रत्येक शीर्षकामधूनच ध्वनीत अर्थ दिसून येतो. इथेही त्याच्या शैलीचाच एक गुण मानावा लागतो भाषाशैलीही समर्पक अशी वापरली असल्याने व खरे खेडे अनुभव बद्ध केल्याने संपूर्ण खेडे चित्रित झाल्यासारखे वाटते विदर्भातील जनजीवन दारिद्रय आर्थिक विषमता, पिळवणूक व या सा-यावर प्रभूत्व गाजवणारी नियती यांच्यातील असलेले परस्पर व गुंतागुंतीचे संबंध अधिक बारकाव्यानिशी व्यक्त होतात. एका अर्थाने दुःख भोगणारी पात्रे म्हणजे नियतीशी शरण गेल्यासारखीच वाटतात. व्यक्ती-समाज, निसर्ग-नियती यांच्यात जो वारंवार संघर्ष चालू असतो. परिवर्तने होत असतात याचे चित्रण शेळके करताना दिसतात. हे चित्रण तटस्थेने करत असल्यामुळे कुठेही हळवी भावूकता येत नाही. कथा अधिक परिणामकारक आणि उठावदार झाल्या आहेत.

सारांश शेळक्यांची कथा मराठी साहित्याला एक वेगळे अनुभव विश्व आणि अभिव्यक्ती देवून जाते साठोत्तरी वाड्.मयात अधिक प्रगल्भपणे सुरू झालेला प्रादेशिकतेच्या प्रवाहात उद्धव ज. शेळके यांची कथा अधिक भर टाकते. त्यामुळे 'वानगी' हा एक उत्कृष्ठ प्रादेशिक कथासंग्रह आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

-०-०-०-०-